संगतीचे प्रकार

आपल्या जीवनात संगत किती महत्त्वाची आहे याबद्दल आपण माहिती घेत आहोत. मागील लेखात आपण पाहिलं आपल्या जीवनात चार प्रकारच्या लोकांची संगत असते.

१. वाट लावणारे, २वाट पाहणारे, ३.वाट शोधणारे,
४ .वाट दाखवणारे

आपण पहिल्या दोन प्रकारच्या लोकांबद्दल मागील लेखात पाहिलं.आता पुढील प्रकार पाहूया.

३.वाट शोधणारे- हे लोक प्रचंड प्रयत्नवादी असतात.कठीण प्रसंगातूनही यशाचा मार्ग शोधतात.आयुष्यात यश किंवा अपयश काही आले तरी स्थिर राहतात आणि प्रयत्नांची पराकाष्ठा करुन यशस्वी होतातच.अश्या लोकांची संगत धरणे नेहमीच चांगले.अशी माणसे आपल्याला प्रयत्न करण्यासाठी प्रेरणा देतात.


प्रल्हाद वामनराव पै
B.Tech(IIT), DMS,M¬M, TQM² (Japan)
आजीव विश्वस्त, जीवनविद्या मिशन

उदाअन्सार अहमद शेख. वय २१ वर्षे. हा जालना चा विद्यार्थी, घरची अत्यंत गरीब परिस्थिती, शालेय शिक्षण जिल्हा परिषदेच्या शाळेमधून घेतलं. पुढील शिक्षणासाठी पुण्यात आला. घरी आई,वडील आणि भाऊ. वडील रिक्शा चालक, त्यामुळे शिक्षणाचा खर्च देखील परवडणारा नव्हता. कधी कधी खाण्यासाठी पुरेसे पैसे नसतं, उपवास घडत असे. पण काही लोक असे असतात की कितीही कठीण परिस्थिती असली तरी रस्ता शोधतात आणि आपली स्वप्न पूर्ण करतात. अन्सार ही त्यापैकीच एक. २०१५ साली णझडउ ची परीक्षा दिली. आणि मे २०१६ मध्ये रिझल्ट लागला. अन्सार अहमद शेख भारतातील सर्वात लहान खड ऑफिसर झाले होते.

४.वाट दाखविणारे- जगातील सर्व माणसांच्या संगतीमध्ये ही संगत सर्वात उत्तम आहे मात्र ती आहे अतिशय दुर्मिळ .हे लोक इतरांना नेहमी योग्य व अचूक मार्गदर्शन करतात.आयुष्यात वेगवेगळ्या परिस्थितीत नेमके कसे वागावे? काय करावे? याबद्दल योग्य व अचूक सल्ला देतात. जीवनाकडे पहाण्याचा नवा दृष्टीकोन देतात.आयुष्यभर इतरांच्या भल्यासाठी,कल्याणासाठी कार्य करतात.

उदा. आपण नेहमी ऐकतो की, आम्ही आमच्या शिक्षकांमुळे जीवनात यशस्वी झालो' असे माणसे सांगतात.कारण त्यांनी शिक्षकांनी केलेल्या मार्गदर्शनाप्रमाणे आचरण केलेले असते.हे शिक्षक देखील आपल्या जीवनात वाट दाखवणारे मार्गदर्शक असतात.सद्गुरू श्री वामानराव पै यांनी देखील अनेकांच्या आयुष्यात असे वाट दाखविण्याचे कार्य केले.त्यामुळे अनेकांचे मोडायला आलेले संसार सावरले.

- व्यसनाधीन झालेले लोक व्यसनमुक्त झाले.
- स्त्रियांना पायपोसाइतकीसुद्धा किंमत न देणाऱ्या पुरुषांमध्ये स्त्रियांचा सन्मान करण्याची मानसिकता निर्माण झाली.
- आत्महत्या करण्यास प्रवृत्त झालेले लोक श्री सद्गुरुंच्या मार्गदर्शनामुळे परावृत्त झाले व ते आज सुखी जीवन जगत आहेत.
- अनेक साधकांना मनःशांती व आरोग्य प्राप्त झाले.

यापैकी वाट लावणारे आणि वाट बघणारे या दोन प्रकारची माणसे मोठ्या प्रमाणावर आणि सहज भेटतात.त्यामुळे त्यांच्यापासून दूर रहाणे तसेच त्यांच्यापासून सावध रहाणे हेच आपल्या हिताचे असते.तसेच आपल्या आजूबाजूला असणाऱ्या वाट शोधणाऱ्या आणि वाट दाखवणाऱ्या लोकांची संगत ओळखुन जाणिवपूर्वक त्यांच्या संगती मध्ये रहाण्याचा तसेच त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे वागण्याचा आपण प्रयत्न करायला हवा.आपले जीवन घडविण्याचे किंवा बिघडविण्याचे विलक्षण सामर्थ्य संगतीत आहे म्हणून संगत धरण्यात माणसाने सदैव सावध असले पाहिजे.

क्रमशः

(उद्याच्या अंकात वाचा : ब्रह्माकुमारीज)

राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात निर्भया पथके स्थापन करणार

डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या सूचनेवर गृहराज्यमंत्री दीपक केसरकर यांची घोषणा

वार्ताहर

नागपूर, दि. १५ : राज्यात घडणाऱ्या महिलाविषयक गुन्ह्यांवर देखरेख ठेवण्यासाठी चार पोलीस अधिकारी असलेल्या विशेष पथकांची राज्याच्या सर्व ३६जिल्ह्यांमध्ये निर्मिती करण्यात येणार आहे. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात निर्भया पथके स्थापन करण्यात येतील. या पथकांत पोलीस उप अधीक्षक (आर्थिक गुन्हे) हे या पथकाचे प्रमुख असून पोलीस निरीक्षक, उपनिरीक्षक आणि सहायक निरीक्षक असे चार अधिकारी व १० कर्मचारी यात कार्यरत असतील. या पथकांना महिलाविषयक गुन्ह्यांचे संपूर्ण नियंत्रण व देखरेख हीच जबाबदारी असेल. मुंबई उपनगरीय रेल्वेतील महिलांचा डबा कायम ठेवण्याबाबत संबंधित यंत्रणांना सूचना देण्यात आल्या आहेत.

शिवसेना उपनेत्या व विधान परिषद प्रतोद आ. डॉ. नीलम गोऱ्हे यांनी विचारलेल्या अल्पकालीन सूचनेवर उत्तर देताना ते बोलत होते.आ. डॉ. नीलम गोऱ्हे म्हणाल्या, राज्यात अनेक ठिकाणी महिलांवर अत्याचार होत आहेत. विविध महिला अत्याचाराच्या घटनाचा आढावा घेण्याची गरज आहे. याचे परिणाम लक्षात घेऊन या घटनांतील आरोपींना तत्काळ अटक व कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी. महिलांना सुरक्षित वातावरण मिळावे याची व्यवस्था राज्य शासनाने करण्याची आवश्यकता आहे.

महिलांना पोलीस स्टेशनमध्ये योग्य ती वागणूक देण्याची व त्यांच्या केसबाबत संवेदनशीलता ठेवून काम करण्याची गरज यावेळी त्यांनी अधोरेखित केली. उपनगरीय रेल्वेत महिलांसाठी आरक्षित असलेला डबा केवळ पोलिसांची संख्या कमी असल्याने रद्द करण्याचा प्रस्ताव रेल्वे सुरक्षा बलाणे दिल्याचा उल्लेख करून मुंबईतील महिला प्रवाशांकरिता हा डबा कायम ठेवण्याची मागणी त्यांनी केली.

गृहराज्यमंत्री दीपक केसरकर यांनी सांगितले की, आ.नीलम गोऱ्हे व महिला आमदारांनी मांडलेली पाहून सरकार विविध उपाययोजना करीत आहे. सर्व जिल्ह्यात सीसीटीव्ही कॅमेरे असलेल्या व्हॅनची गस्त शाळा परिसरात जाण्या येण्याच्या मार्गावर ठेवण्यात येणार आहे. या पथकांचे काम अधिक प्रभावीपणे होईल. याविषयी असलेल्या कायद्यांचे पालन करण्याची जबाबदारी या पथकाची असेल.

पोलीस महासंचालकांना याबाबत नियमितपणे अहवाल सादर करण्यात येणार आहे. शहरीभागासोबत व ग्रामीण,दुर्गम भागात ही दामिनी पथके कार्यरत करण्यात येतील. नीलम गोऱ्हे यांच्या सहभागाने एक महिला सुरक्षेवर समिती तयार केली.त्या समितीची बैठकही हिवाळी अधिवेशन संपल्यानंतर मी मुंबईत लगेचच बैठक घेण्यात येईल. या अल्पकालीन सूचनेवर आ. ॲड हुस्नबानू खलीफे, आ. स्मिता वाघ यांनी चर्चेत भाग घेतला. आ. विद्या चव्हाण यांनीही प्रस्तावास अनुमोदन दिले होते.

नितेश राणे, कालीदास कोळंबकरांवर कारवाई होणार

राधाकृष्ण विखे-पाटील यांची माहिती

विशेष प्रतिनिधी

नागपूर, दि. १६-नुकत्याच पार पडलेल्या विधानपरिषद पोटनिवडणुकीत पक्षाचा आदेश झुगारून आमदार नितेश राणे आणि कालिदास कोळंबकर यांनी मतदान केल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे विरोधीपक्षनेतेपद गेले तरी बेहत्तर पण, या दोघांवर पक्षाकडून कारवाई केली जाईल, असे विधानसभेतील विरोधीपक्षनेते राधाकृष्ण विखे - पाटील यांनी शुक्रवारी येथे सांगितले.

विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनानिमित्त येथे आलेल्या पत्रकारांशी सुयोग निवासस्थानी अनौपचारिक गप्पा मारताना विखे-पाटील यांनी पोटनिवडणुकीतील मटफुटीची पक्षाने गंभीर दखल घेतल्याचे सांगितले. यासंदर्भातील अहवाल तयार करून पक्षश्रेष्ठींना पाठवला आहे. आता पक्षाकडून नितेश राणे आणि कालिदास कोळंबकर यांच्यावर कारवाई करण्याबाबत लवकरच निर्णय होईल, असे त्यांनी सांगितले.

७ डिसेंबरला झालेल्या विधानपरिषद पोटनिवडणुकीत नितेश राणे आणि कालिदास कोळंबकर यांनी भाजपचे उमेदवार प्रसाद लाड यांना मतदान केल्याचे स्पष्ट झाले आहे. त्या दोघांनीही प्रसिध्दी माध्यमांना तशी माहिती दिली. मतदानानंतर नितेश राणे यांनी तर कॉंग्रेसने कारवाई करून दाखवावी, असे आव्हान दिले होते.

विधानभेत कॉंग्रेसचे ४२ तर राष्ट्रवादीचे ४१ सदस्य आहेत. या दोघांवर कारवाई केली तर कॉंग्रेसचे संख्याबळ राष्ट्रवादीपेक्षा कमी होऊन कॉंग्रेसकडे असलेले विरोधीपक्षनेतेपद राष्ट्रवादीकडे जाऊ शकते. परंतु, विखे - पाटील म्हणाले, या दोघांनी पक्षाशी गद्दारी केल्याचे स्पष्ट आहे. या प्रकरणी पक्षाचे निवडणूक प्रतिनिधी आमदार शरद रणपिसे यांच्याकडून अहवाल घेऊन तो पाठवला आहे.या दोघांनी माध्यमांना दिलेल्या प्रतिक्रीयांच्या क्लीपही गोळा करण्यात आल्या आहेत. त्यामुळे दोघांवर पक्ष निश्चितपणे कारवाई करेल. कारवाई करताना माझें विरोधीपक्षनेतेपद गेले तरी पक्षहितासाठी त्याचा विचार केला जाणार नाही.

'कडोंमपा' आयुक्तांना कारणे दाखवा नोटीस

लक्षवेधी

वार्ताहर

नागपूर, दि. १५ - राज्य शासनाने अधिकाऱ्यावर कारवाईचे निर्देश दिल्यानंतरदेखील पावले न उचलणाऱ्या कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या आयुक्तांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात येणार असल्याचे नगरविकास राज्यमंत्री डॉ.रणजित पाटील यांनी स्पष्ट केले. 'कडोंमपा'च्या करनिर्धारक व संकलक पदावर कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई न झाल्यासंदर्भात ॲड.अनिल परब यांनी लक्षवेधी सूचना मांडली होती.

'कडोंमपा'च्या करनिर्धारक व संकलक अनिल लाड हे दोन कंपन्यांच्या संचालक पदावर कार्यरत आहेत. महाराष्ट्र नागरी सेवा नियमांनुसार कोणत्याही शासकीय कर्मचाजयाने शासनाची मंजुरी मिळाल्याशिवाय इतर नोकरी स्वीकारता कामा नये.

यासंदर्भात 'मिनिस्ट्री ऑफ कंपनी अफेअर्स'ने लाड दोषी असल्याचा अहवाल पाठविला होता. याबाबत मार्च २०१६ च्या अधिवेशनातदेखील लक्षवेधी उपस्थित झाली होती. ११ जुलै २०१७ रोजी सभापतींच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत कारवाईचे निर्देश आयुक्तांना देण्यात आले होते. मात्र आयुक्तांनी शासनाकडे कारवाईसंदर्भात पत्राद्वारे मार्गदर्शन मागितले होते.

जर स्पष्ट निर्देश होते तर त्यांनी मार्गदर्शन मागण्याची गरज नव्हती. लाड यांना निलंबित करण्यात येईल व शासनाच्या निर्देशांचे पालन न केल्याबद्दल 'कडोंमपा' आयुक्तांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात येईल, असे उत्तर डॉ.पाटील यांनी सभागृहासमोर दिले.

मुंबई- गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणात भ्रष्टाचार

नितेश राणे यांचा आरोप

विशेष प्रतिनिधी

नागपूर, दि. १५-मुंबई- गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या कामात भ्रष्टाचार सुरू आहे. महामार्गासाठी मोजणीपेक्षा जास्त जमीन घेतली जात असून त्यासाठी प्रकल्पबाधितांकडून पैसे घेऊन नोटीस देण्यात येत असल्याचा आरोप कॉंग्रेस आमदार नीतेश राणे यांनी शुक्रवारी विधानसभेत केला.

राणे यांनी औचित्याच्या मुद्याद्वारे चौपदरीकारणाच्या कामात होत असलेल्या भ्रष्टाचाराचा मुद्दा मांडला. स्थानिक प्रांत अधिकारी कर्मचाऱ्यांना हाताशी धरून तसेच पैसे घेऊन लोकांना नोटीस देत आहेत.त्यामुळे त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करावी, अशी मागणी राणे यांनी केली. महामार्गाच्या चौपदरीकरणाला लोकांचा विरोध नाही. परंतु, ज्यांनी अतिरिक्त जमिनी दिल्या त्यांना योग्य मोबदला मिळालेला नाही, याकडे त्यांनी सरकारचे लक्ष वेधले.

वृत्तपत्र विक्रेत्यांना लाभ द्या

राज्यातील वृत्तपत्र विक्रेत्यांना अनधिकृत फेरीवाला समजू नये. त्यांच्यासाठी स्टॉल, घरकुल योजना राबवावी. वृत्तपत्र विक्रेत्यांची सेवा अत्यावश्यक सेवा समजून त्यांच्यावर महापालिकेकडून कोणतीही कारवाई होऊ नये, अशी मागणी भाजपचे आमदार संजय केळकर यांनी औचित्याच्या मुद्द्याद्वारे केली.

कनिष्ठ महाविद्यालयांची पात्र यादी तात्काळ घोषित करणार

शिक्षणमंत्री विनोद तावडे यांची माहिती

विशेष प्रतिनिधी

नागपर, दि. १५- १ व २ जुलै, २०१६ अन्वये मूल्यांकन करुन अनुदानास पात्र घोषित करण्यात आलेल्या प्राथमिक शाळा व माध्यमिक शाळांतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना २० टक्के अनुदान देण्याची घोषणा शिक्षणमंत्री विनोद तावडे यांनी आज केली. तसेच ऑनलाईन मूल्यांकन झाल्यानंतर अनुदानास पात्र ठरणाऱ्या कनिष्ठ महाविद्यालय/उच्च माध्यमिक शाळा आणि तुकड्यांची यादी माध्यमिक शिक्षण संचालनालयाकडे प्राप्त झाली असून हे अधिवेशन संपण्यापूर्वी ही पात्र यादी घोषित करण्यात येईल, असे शिक्षणमंत्री तावडे यांनी आज विधान परिषदेत घोषित केले. २० टक्के अनुदान प्रकरणी मंत्रीमंडळाने यापूर्वी घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने पुढील अनुषंगिक कार्यवाही तात्काळ केली जाईल, असेही श्री. तावडे यांनी स्पष्ट केले.

१४ जून २०१६ पूर्वी अनुदानास पात्र घोषित करण्यात आलेल्या शाळांना अटी व शर्तीच्या अधीन राहून २० टक्के अनुदान देण्याचा निर्णय ३० ऑगस्ट २०१६ च्या मंत्रीमंडळ बैठकीत घेण्यात आला होता, तोच निर्णय १ व २ जुलै, २०१६ च्या पात्र शाळांसाठी लागू राहील, असेही तावडे यांनी सांगितले.

गोसेखुर्द दोन वर्षांत पूर्ण करणार - महाजन

वार्ताहर

नागपूर, दि. १५ - अडीच लाख हेक्टर जमीन ओलिताखाली आणण्याची क्षमता असलेला गोसेखुर्द प्रकल्प येत्या दोन वर्षांत पूर्ण करणार असल्याचे आश्वासन जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांनी आज सभेत दिले. जून २०१८ पर्यंत चारही खोऱ्याच्या जलआराखड्याचे कामे पूर्ण होणार असून, २०१९ पर्यंत जलसंधारणाची राज्यातील कामे पूर्ण करण्यासंबंधी नियोजन करण्यात येत असल्याचेही ते म्हणाले. सत्ताधाऱ्यांनी मांडलेल्या प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना ते बोलत होते. गोसेखुर्द प्रकल्पाची कामे लवकरात लवकर करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

बोंडअळी.. बोंडअळी चौथ्या दिवशीही बोंडअळी!

लक्ष्यवेध
अरविंद भानुशाली

गेले चार दिवस विधानसभेत विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रात कापसावर पडलेल्या बोंडअळीचा प्रश्न वेगवेगळ्या मार्गाने उपस्थित होतो. कधी प्रश्नोत्तरे तर कधी लक्षवेधी सूचनेतून सत्ताधारी आणि विरोधी पक्षाच्या प्रस्तावावर वेगवेगळ्या मार्गाने चर्चा होत आहे.आजही विरोध पक्षाने बोंडअळी संदर्भात लक्षवेधी सूचना दिली. त्यावर तेच तेच उतारे सरकारकडून आल्याने विरोधकांनी आज सभात्याग केला.

विधिमंडळ अधिवेशनाच्या पहिल्या आठवड्याचा शुक्रवार हा शेवटचा दिवस. अशासकीय कामकाजाचा दिवस म्हणून शुक्रवार गणला जातो. मंत्र्यांना, आमदारांना मतदारसंघात जाण्याची घाई असल्याने सर्वसाधारणपणे दुपारी तीन वाजता कामकाज संपत असते. परंतु अलीकडे हे संकेत गुंडाळले जात आहेत. प्रश्नोत्तरे, लक्षवेधी, औचित्यचे मुद्दे, स्थगन प्रस्ताव व इतर विषयावर कार्यक्रम पत्रिका काढली जाते. अलीकडे अशासकीय कामकाजाला विशेष महत्व दिले जात नाही.

साखर उद्योगावर हर्षवर्धन जाधव या सदस्याने साखर कारखानदार काही फसवणूक करतात यावर लक्षवेधी मांडली. परंतु पहिल्या बाकड्यावर बसलेले राधाकृष्ण विखे - पाटील, अजित पवार, जयंत पाटील, दिलीप वळसे पाटील या साखरसम्राटांनी त्याला वेगळे वळण देऊन हर्षवर्धन जाधव यांचा मूळ प्रश्न मोडून काढला. विधानसभेत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मतारखेवरून सभागृहात गोंधळ झाला. भाजप आणि शिवसेना या सत्ताधारी पक्षाचे म्हणणे होते महाराजांचा जन्मदिवस हा तिथीप्रमाणे साजरा करावा तर विरोधकांचे म्हणणे होते. यापूर्वी निश्चित झालेला १९ फेब्रुवारी हा दिवसच तज्ज्ञांनी निश्चित केला आहे. यावरून दोन्ही बाजुचे सदस्य एकमेकांना भिडले. विरोधी पक्षनेते विखे पाटील यांनी २९३ चा प्रस्ताव मांडताना शिवसेना आमदार प्रकाश आबिटकर या आमदाराने कर्जमाफी घेतल्याचा सनसनाटी आरोप करून खळबळ उडवून दिली. याचा शिवसेना आमदार आबिटकर यांनी सभागृहात खुलासा करताना सांगितले की, मी कर्जमाफीसाठी कुठलाही अर्ज केलेला नाही. अथवा तशी मागणी बँकेकडे केलेली नाही. मी एक रुपयाचीही कर्जमाफी घेतली नाही. त्यामुळे विरोधी पक्ष नेत्यांनी भन्नाट आरोप करू नयेत, या आरोपावर शिवसेनेचे आमदार एकत्र येऊन घोषणा देऊ लागले. विधान परिषदेत शुक्रवारी रस्त्यावरेल खड्डे आणि मराठा आरक्षणाचा प्रश्न गाजला. खड्डयांबाबत तर सार्वजनिक बांधकाम खात्याचे मंत्री चंद्रकांत पाटील यांना माध्यमांसमोर येऊन राज्यातील ८२.५ टक्के खड्डे भरल्याचे सचित्र दाखवले. उर्वरित खड्डे मुदतीपूर्वी भरले जातील, असे आश्वासित केले.

मुंब्रा बाह्यवळण रस्त्यावर टोल लावणार

सा. बा. मंत्री चंद्रकांत पाटील यांची माहिती

विशेष प्रतिनिधी

नागपूर, दि. १५- ठाणे जिल्ह्यातील मुंब्रा बाह्यवळण रस्त्याची देखभाल दुरुस्ती थांबल्याने हा रस्ता पुन्हा सुस्थितीत आणण्यासाठी त्यावर टोल बसवला जाईल, अशी माहिती सार्वजनिक बांधकाम मंत्री चंद्रकांत पाटील यांनी शुक्रवारी विधानसभेत दिली. या बाह्यवळण रस्त्याचे काम केलेल्या कंत्रातदारासोबत पुढील आठवड्यात सोमवारी किंवा मंगळवारी बैठक घेऊन निर्णय घेतला जाईल, असेही पाटील यांनी सांगितले.

राष्ट्रवादी कॉंग्रेसचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी आज विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात मुंब्रा बाह्यवळण रस्त्याच्या दुरावस्थेबद्दल प्रश्न विचारला होता. या प्रश्नाला उत्तर देताना पाटील म्हणाले, मुंब्रा बाह्यवळण रस्त्यावर उन्नत मार्गाचे काम बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा या तत्वावर घेण्याच्यादृष्टीने वाहतूक गणना करून सुसाध्यता अहवाल तयार करण्याचे काम सुरू आहे.

टोल नाके नकोत म्हणून हायब्रीड ऑन्युटी तत्वावर ३० हजार कोटी रुपये खर्चाचे १० हजार किलोमीटरचे रस्ते बांधण्यात येतील. या रस्त्यांवर कुठेही टोल आकारला जाणार नाही. छोटी चारचाकी वाहने वगळून मोठ्या वाहनांना टोल लावण्याचे सरकारचे धोरण आहे, अशी माहिती पाटील यांनी दिली.

दरम्यान, मुंबईतील पाच प्रवेशद्वारावर छोट्या वाहनांना टोल आकारू नये यासंदर्भातील अहवाल वित्त खात्याकडे पाठवण्यात आला आहे.वित्त विभाग छोट्या वाहनांना टोलमधून वगळण्याच्या व्यवहार्यतेवर विचार करत असल्याचे पाटील यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितले. यावेळी एकनाथ खडसे, अजित पवार, सुभाष भोईर, संजय केळकर आदिंनी प्रश्न विचारले.

एशियाटिक लायब्ररीच्या कामाची चौकशी होणार

मुंबईतील एशियाटिक लायब्ररीच्या नुतनीकरण कामाच्या संदर्भात कंत्राटदार आणि अधिकाऱ्यांची चौकशी केली जाईल, अशी घोषणा चंद्रकांत पाटील यांनी अन्य एका प्रश्नाच्या उत्तरात केली. याशिवाय एशियाटिक लायब्ररीच्या छतातून होणारी पाण्याची गळती महिनाभरात थांबावली जाईल असे आश्वासनही त्यांनी दिले.

शिवडी येथे उद्या रोजगार मेळावा

मुंबई, शुक्रवार (प्रतिनिधी): जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र मुंबई शहर यांच्या संयुक्त विद्यामाने, बेरोजगार तरुणासाठी रोजगार मिळाव्याचे आयोजन केले. हा मेळावा रविवार दि. १७ डिसेंबर रोजी प्रबोधनकार ठाकरे, म्युन्सिपल प्रायमरी स्कुल, शिवडी, येथे सकाळी १०.०० ते दु. ३.०० या वेळेत होणार आहे.

दहावी पास/नापास/१२ वी पास/पदवीधर/पदव्युत्तर/पदवीधारक /आय टी आय/एन.सी.टी.व्हि.टी. धारक यांच्यासाठी हा रोजगार मेळावा आहे.

या रोजगार मेळाव्यास खाजगी क्षेत्रातील उद्योजक प्रत्यक्ष मुलाखतीसाठी उपस्थित राहणार आहेत. या मेळाव्यात विविध क्षेत्रात किमान २०० हून अधिक रिक्तपदाची भरती होणार आहे.

TATA
TATA STEEL LIMITED
Registered Office: Bombay House, 24, Homi Mody Street, Fort, Mumbai - 400 001, India
Tel.: +91 22 6665 8282 Fax No.: +91 22 6665 7724
Email: cosec@tatasteel.com Website: www.tatasteel.com
CIN: L27100MH1907PLC000260

सूचना

कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम ९१ आणि कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियमावली, २०१४ च्या नियम १० (१) अन्वये **याद्वारे सूचना देण्यात येते** की, प्रायव्हेट प्लेसमेंट बेसिसवर निर्गमित आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडच्या होलसेल डेब्ट मार्केट सेगमेंटवर सूचिबध्द नॉन-कन्व्हर्टेबल डिबेंचर्स वरील व्याज खालीलप्रमाणे देय आहे :

अ. क्र.	नॉन-कन्व्हर्टेबल डिबेचर्स (एनसीडीज)	रोजी देय व्याज	व्याज देयाकरिताची नोंदीत तारीख
१	६ जानेवारी, २०११ रोजी वाटप केलेले १०.२५% एनसीडीज एकूण रु. २,५०० कोटी (ISIN:INE081A08157)	६ जानेवारी, २०१८	२ जानेवारी, २०१८

टाटा स्टील लिमिटेड
१५ डिसेंबर , २०१७
मुंबई
सही/-
सौ. अनिता कल्याणी
अतरिम कंपनी सचिव
TATA STEEL

राज्यातील १७ जिल्ह्यातील रस्त्यांवर संपूर्ण खड्डेमुक्ती

विशेष प्रतिनिधी

नागपूर, दि. १५ : सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित येत असलेल्या प्रमुख राज्य मार्ग, राज्य मार्ग व प्रमुख जिल्हा मार्गावरील खड्डे १५ डिसेंबरपर्यंत बुजविणात येणार असल्याचे सांगितले होते. यासाठी मंत्रालयात वॉररुमही सुरू केली होती.

या मोहिमेला यश आले असून प्रमुख राज्य मार्ग व राज्य मार्गावरील ९७.२५ टक्के तर प्रमुख जिल्हा मार्गावरील ८२.८४ टक्के खड्डे बुजविण्यात आले आहेत.

उर्वरित कामे वेगाने सुरू असून लवकर सर्वच रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यात येणार आहेत, अशी माहिती राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली.

विधानभवनात पत्रकारांशी संवाद साधताना पाटील यांनी खड्डेमुक्त रस्ते अभियानाची माहिती दिली.

ते म्हणाले की, गेल्या अनेक वर्षापासून राज्यातील रस्त्यांची कामे ही वाहतुकीचा अंदाज न घेता, क्षमता न पाहता करण्यात आली आहेत. त्यामुळे पावसाळ्यात राज्य मार्गावरील रस्त्यांवर खड्डे पडतात.

सार्वजनिक बांधकाम विभागाकडे एकूण ८९१९० किमी लांबीचे रस्ते असून त्यामध्ये ६ १६३ किमीचे प्रमुख राज्य मार्ग, ३० हजार ९७० किमीचे राज्य मार्ग आणि ५२०५७ किमीचे लांबीचे प्रमुख जिल्हा मार्ग आहेत. आज प्रमुख जिल्हा मार्गावरील खड्डे पडलेल्या २३३८१ किमी लांबीच्या रस्त्यांपैकी २२ हजार ७३६ किमी (९७.२५ टक्के) लांबीच्या रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यात आले आहेत.

वसंत देसाई यांच्या स्मृतिदिनी २२ डिसेंबरला कार्यक्रम

मुंबई, शुक्रवार (प्रतिनिधी)- दिवंगत संगीतकार वसंत देसाई यांच्या ४३ व्या स्मृतिदिनानिमित्त २२ डिसेंबर रोजी एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

संगीतकार सोमनाथ परब व युवा कला मंचातर्फे वसंत देसाई चौक, शिवाजी पार्क, दादर येथे हा कार्यक्रम होणार आहे.

या कार्यक्रमात ५ ते ९ वी पर्यंतचे ५०० शालेय विद्यार्थी व विद्यार्थिनी सहभागी होणार आहेत. त्यांची किमान ८ गाणी सादर करून त्यांना संगीतमय स्वरांजली अर्पण केली जाईल, असे युवा कला मंचाचे सोमनाथ परब यांनी कळवले आहे.

या थोर संगीतकाराचे संगीत क्षेत्रातील योगदानबद्दल ऋण फेडण्याचा प्रयत्न केला जाणार आहे, असे युवा कलामंचने जाहीर केले आहे.

नवशक्ति रोजगाराच्या संधी
नोकरी शोधताय? बरेच प्रयत्न करूनही कुठेच यश मिळत नाही? नोकरीसाठी अर्ज करून-करून थकलात? नोकरी देणाऱ्या वेबसाईट्स आणि वर्तमानपत्रं वाचून वैतागलात? आता वाचा नवशक्ति रोजगार संधी. तुमच्या आवडीची नोकरी मिळवण्यास मदत करणारा मदतनीस म्हणजे नवशक्ति रोजगार संधी...

गुरुवारी वाचायला विसरू नका

आजचे कार्यक्रम

अ.भि. गोरेगावकर इंग्लिश स्कूल : अमृत महोत्सव सांगता समारंभ माजी विद्यार्थ्यांसाठी कार्यक्रम - स. ११ ते संध्या. ६, संगीत संध्या - संध्या. ६ ते रात्री ९, अ. भि. गोरेगावकर इंग्लिश स्कूलचे पटांगण, आरे रोड, गोरेगाव (पूर्व)